रजि.नं. : ई-६९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/4422/२०२५
दिनांक: 17/03/2025

**रजी. ए. डी.**

प्रती,
**श्री यशवंत दिनकर गाडे**
फ्लॅट नं. १२, पांझरा ०६ अपार्टमेंट
किशोर सुर्यवंशी मार्ग, आरटीओ ऑफीस जवळ
दिडोंरी रोड, नाशिक – ४२२००४

**विषय- श्री साईप्रसादालय इमारतीचे छतास असलेल्या कौलारु डोमचे नूतनीकरण व वॉटरप्रुफींगचे कामाबाबत – “Termination of Contract”.**

**संदर्भ-** - ०१. आपणास दिलेला संस्थान जा.नं./एसएसएसटी/बांधकाम/५५४/२०२४, दि.१०/०५/२०२४ रोजीचा कार्यादेश
०२. संस्थानचे दि.२२/०६/२०२४ रोजीचे पत्र
०३. संस्थानचे दि.१६/०९/२०२४ रोजीचे पत्र
०४. संस्थानचे दि.०१/१०/२०२४ रोजीचे पत्र
०५. संस्थानचे दि.१५/१०/२०२४ रोजीचे पत्र
०६. संस्थानचे दि.२१/१०/२०२४ रोजीचे पत्र
०७. आपले दि.१२/११/२०२४ रोजीचे दोन पत्र, दि.१५/११/२०२४ व दि.२८/११/२०२४ रोजीचे पत्र
०८. संस्थानचे दि.०५/१२/२०२४ रोजीचे पत्र
०९. आपले दि.१०/१२/२०२४ रोजीचे पत्र
१० संस्थानचे दि.२४/१२/२०२४ रोजीचे पत्र
११. आपले दि.२७/१२/२०२४ रोजीचे बिल मागणीबाबत पत्र
१२. संस्थानचे दि.३०/१२/२०२४ रोजीचे पत्र
१३. आपले दि.०३/०१/२०२५ रोजीचे पत्र
१४. संस्थानचे दि.२३/०१/२०२५ रोजीचे पत्र
१५. आपले दि.२४/०१/२०२५ रोजीचे पत्र
१६.आपणास दिलेले जा.नं./एसएसएसटी/बांधकाम/३७९१/२०२५,दि.३१/०१/२०२५ रोजीचे पत्र
१७. आपले दि.०१/०२/२०२५ रोजीचे पत्र
१८. मा. तदर्थ समितीचे दि.२७/०२/२०२५ रोजीचे सभेतील नि.क्र.८१/१०

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मौजे निमगाव को-हाळे गट नं.८०, ८५ मधील श्री साई प्रसादालय इमारतीच्या छतास असलेल्या कौलारु डोमचे नुतनीकरण व वॉटर प्रुफींग करणे या कामासाठी आपण दि.१४/०३/२०२४ रोजी ई-टेंडर (Tender ID – 2024_SAI _1018739_1) भरलेली आहे. सदरहु कामासाठी संस्थानचे मा. तदर्थ समितीचे दि.२८/०४/२०२४ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२३० अन्वये मान्यता मिळालेनुसार आपणास जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/५५४/२०२४, दि.१०/०५/२०२४ अन्वये कार्यादेश देण्यात आला होता. तसेच या कामासाठी आपले समवेत दि.११/०५/२०२४ रोजी करारनामा करण्यात आला होता.

पान नंबर २ वर

मुंबई : साईनिकेतन, ८०४, ब, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई – ४०० ०१४
दुरध्वनी : +९१-२२-२४१६६५५६ फॅक्स : +९१-२२-२४१५०७९८. टेलिग्राम – साईनिकेतन, मुंबई.
● Website : http://www.shrisaibabasansthan.org / www.sai.org.in ● Email : saibaba@sai.org.in

संस्थानचे वरिल संदर्भिय क्र. ०२ चे पत्राद्वारे आपणास सदरहु काम तात्काळ सुरु करणेबाबत कळविण्यात आले होते. तसेच आपले मार्फत कामास सुरुवात न केल्यास आपलेशी केलेला करारनामा रद्द करुन निविदेतील पान क्र. ५१ वरील अट Termination of Contract in part or in full for Contractor's Default नुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यात आले होते. तथापी आपलेमार्फत सदर पत्राची दखल घेऊन तात्काळ उर्वरीत कामास सुरुवात न करता आपले दि.०१/०२/२०२५ रोजीचे पत्रान्वये पुन्हा एकदा अवास्तव रक्कमेची मागणी केली आहे. आपणास प्रकल्पाचे कामासाठी देण्यात आलेला वाढीव मूदतीत व त्यानंतर वरिल संदर्भिय पत्रांद्वारे वारंवार संधी देऊनही आपण प्रकल्पाचे काम पूर्ण केले नाही. त्यामुळे निविदेतील अटी शर्तीनुसार व मा. तदर्थ समितीचे दि.२७/०२/२०२५ रोजीचे सभेतील नि.क्र.८१/१० अन्वये समंत झालेल्या निर्णयानुसार आपणास दिलेला कार्यादेश तसेच आपले समवेत केलेला करारनामा रद्द करण्यात (Termination of Contract) आला आहे. तसेच आपले संस्थानकडे जमा असलेले सिक्युरीटी डिपॉझीट व बिलाची शिल्लक रक्कम जप्त करुन आपले Risk and Cost वर संस्थानमार्फत उर्वरीत काम पूर्ण करुन घेणेत येत आहे. सदरहु कामासाठी लागणारा वाढीव खर्च हा आपले संस्थानकडे जमा असलेल्या रक्कमेतून वसूल करण्यात येऊन निविदा शर्तीनुसार आवश्यक वजावटी करुन शिल्लक राहीलेली रक्कम आपणास परत करण्यात येईल. तसेच आपणास देण्यात आलेल्या कार्यादेशातील व करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सदरहू काम आपण वेळेत पूर्ण न केल्याने आपल्या फर्मचे नांव तिन वर्षासाठी संस्थानचे काळ्या यादीत टाकण्यात येत आहे.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी